॥ श्री ॥
॥ बाबा ॥

काय वर्णावा बाबांचा महीमा
तो प्रेमाचा सागर ही उणा,
त्याला आकाश आकाश तोकडे
त्याला नसे हो उपमा उपमा ॥धृ॥

तिन्ही त्रिकाळ गुरुमहिमा सांगती
गुरुनामाचे अभ्यंग स्नान घालिती ॥1॥

बाबांनी दिला हो नाश्ता तो ॐ कारी
पु-या दिवसाचा आंनदघन मुरारि ॥2॥

बाबांनी दावियला सद्-मार्ग तो नामाचा
काटे वेचूनी सडा फुलांचा ॥3॥

बाबांनी शिजविले भोजन मधूर
भरवूनी जना बाबा देती ढेकर
देती देती हो तृप्तीची ढेकर ॥4॥

बाबांनी मायेचे हो अंथरुण घातले
गाऊन अंगाई सुखासने निजविले
शांती समाधनाचे घालून पांघरुण,
त्यांनी आम्हाला सुखासने निजविले ॥5॥

अस्से प्रेमळ बाबा रागाविता

सोडा रडणे हो आम्हा होती गुदगुल्या ॥6॥

बाबांना नाही तो भेद सान थोर
येडी येडपी म्हमदू म्हमदी
सारी आहेत हो बाबांची लाडकी ॥7॥

बाबांना स्मरुनी प्रेम दयावे घ्यावे
बाबांना स्मरुनी शरणांगत व्हावे ॥8॥

जाऊ हासत नाचत वांगणी,
करु प्रपंच प्रपंच मौजेने
हा सहजयोग हीच शिकवण
करु बाबांसवे जन्माचे सार्थक ॥9॥

★★★★★